




सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २४७ • मंगळवार दि.३० जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.


# शिंदेंचे ऑपरेशन टायगर ३.० फत्ते;ठाकरेंना मोठा धक्का!

## आ.सचिन आहिर यांना शिंदे गटाची उपसभापतीपदासाठी उमेदवारी



मुंबई/प्रतिनिधी-राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी घडामोड घडली असून विधान परिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे विधान परिषद सदस्य सचिन अहिर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेकडून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. काही दिवसांपूर्वी ठाकरे गटातील सहा खासदारांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर हा उद्धव ठाकरे यांच्यासाठी आणखी एक मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी बुधवारी (१ जुलै) निवडणूक होणार आहे. माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचा सदस्यत्वाचा कार्यकाळ १३ मे २०२५ रोजी संपल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. पावसाळी अधिवेशनात या पदाची निवडणूक होत असून महायुतीत हे पद शिवसेना शिंदे गटाकडे जाणे जवळपास निश्चित मानले जात होते. राजकीय चर्चेनुसार या पदासाठी डॉ. नीलम गोऱ्हे यांचे नाव आघाडीवर होते. नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीत त्या बिनविरोध निवडून आल्याने त्यांनाच पुन्हा संधी मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र ऐनवेळी शिंदे गटाने सचिन अहिर यांना उमेदवारी देत राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल घडवून आणला. यापूर्वी ठाकरे गटाचे पान ४ वर

# एनडीसीसी बँक निवडणूक

## खा.रविंद्र चव्हाण,बेटमोगरेकर,जवळगावकर, खतगावकर यांच्यासह अनेक उमेदवारांचा अर्ज दाखल




(छाया : करणसिंह बैस)

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या आज (मंगळवार) शेवटच्या दिवशी उमेदवारांनी व त्यांच्या समर्थकांनी गर्दी केली होती. खा.रविंद्र चव्हाण, माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर, माजी आ. हनमंत पाटील बेटमोगरेकर, माजी आ. मोहनअण्णा हंबर्डे, डॉ. मिनल पाटील खतगावकर, सौ.पुनम पवार, कैलाश गोरठेकर, मारोतराव कवळे गुरुजी या प्रमुख उमेदवारांसह अनेकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षीक निवडणुकीसाठी दि.२३ जुलै रोजी निवडणूक होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालय परिसरात राजकीय पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. गेल्या २० वर्षापासून आर्थिक डबघाईला आलेल्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला सध्या चांगले दिवस आले आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा आर्थिक तोटा कमी होवून बँक नफ्यात आली आहे. बँकेच्या विद्यमान संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणूक सुरु झाली आहे. जिल्हा बँकेच्या २३ जागांसाठी खा.रविंद्र चव्हाण, आ.भीमराव केराम, आ.डॉ.तुषार राठोड, माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर, माजी आ. हनमंत पाटील बेटमोगरेकर, माजी आ. मोहनअण्णा हंबर्डे, प्रविण पाटील चिखलीकर, गोविंदराव शिंदे नागेलीकर, राजेश पावडे, कैलाश गोरठेकर, रामचंद्र मुसळे, सौ.पुनमताई पवार, उमाकांत गोपछडे, राजेश देशमुख कुटुंरकर, मुकुंद जवळगावकर, विजय धोंडगे, डॉ.सुनील धोंडगे, दत्तु रेड्डी, चंद्रसेन पाटील, बालाजी पांडागळे यांच्यासह इतर उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

महायुती व महाविकास आघाडीच्या पान ४ वर

# पेट्रोल-डिझेल उद्यापासून नियंत्रणमुक्त,पण दर कायम

नवी दिल्ली:केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या विक्रीवरील सर्व निर्बंध हटवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, १ जुलैपासून त्याची अंमलबजावणी होणार आहे. यामुळे वाहतूक, मालवाहतूक तसेच औद्योगिक क्षेत्रातील व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. इराण-अमेरिका संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर खनिज तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्यानंतर सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून लागू केलेले निर्बंध आता मागे घेण्यात आले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्या तेलाच्या किंमती ढासळल्या असल्या तरी केंद्र सरकारने पेट्रोल-डिझेल दरात कुठलीही कपात अजुनपर्यंत केलेली नाही.

अमेरिका-इराण-इस्त्राइल युद्धामुळे जगभरात पेट्रोल-डिझेल, गॅस टंचाई निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर १२ जूनपासून लागू करण्यात आलेल्या नियमांनुसार एका ग्राहकाला डिझेलची विक्री २०० लिटरपर्यंत मर्यादित करण्यात आली होती. तसेच रिटेल इंधनाचा व्यावसायिक वापर होऊ नये आणि काळाबाजार रोखता यावा, यासाठी इंधन विक्रीवर नियंत्रण ठेवण्यात आले होते. मात्र परिस्थिती सुधारल्याने हे सर्व निर्बंध हटविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.दरम्यान, ३० जून २०२६ ही तारीख आर्थिक आणि करसंबंधित अनेक कामांसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. १ जुलैपासून काही नवे नियम लागू होणार असल्याने नागरिकांनी प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# उमरी पोलीस ठाण्यातील दोन पोलीस कर्मचारी निलंबित

नांदेड/प्रतिनिधी-उमरी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसुर केल्या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांनी तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे.

उमरी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले चालक सुनील गोपालराव कोलबुद्धे व चालक सिद्दीकी हे दोघेजण जनतेकडून पैसे घेत असल्याचा व्हिडीओ समाजमाध्यमावर पोहचला. पुराव्यानिशी समोर आलेल्या या व्हिडीओची डॉ.निलाभ रोहन यांनी गंभीर दखल घेतली. पोलीस चालक सिद्दीकी व सुनील कोलबुद्धे यांना तातडीने निलंबित केले आहे. पोलीस अधीक्षकांच्या कारवाईमुळे नांदेड पोलीस दलात खळबळ उडाली आहे. अवैध धंद्यांची वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आता चांगलेच धाबे दणाणले. या निलंबित दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांना चौकशीला सामोरे जावे लागणार आहे.

# टीईटी पेपरफुटीचे रॅकेट आग्रा ते बिहार

## मुख्य सूत्रधार गुप्ताच्या शोधासाठी पोलिसांची धावपळ

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता महाराष्ट्राबाहेर पोहोचले असून या गैरव्यवहाराचे आग्रा, बिहार, हरियाणा आणि दिल्लीशी संबंध उघड होत आहेत. महाराष्ट्रातील टीईटी प्रश्नपत्रिकेची छपाई उत्तर प्रदेशातील आग्रा येथे का करण्यात आली, असा सवाल उपस्थित होत असतानाच या प्रकरणातील कथित मुख्य सूत्रधार विजयेंद्र कुमार ऊर्फ विजेंद्र गुप्ता याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची व्याप्ती वाढविली आहे.

राज्यात २८ जून रोजी होणारी टीईटी परीक्षा प्रश्नपत्रिका फुटल्याचे उघड झाल्यानंतर जून रोजी रद्द करण्यात आली होती. या प्रकरणी भिवंडी पोलिसांनी आतापर्यंत राजीव प्रयाग शाम, आकाश कुमार स्वराज कुमार आणि धीरज बलराज सिंग या तिघांना अटक केली आहे. त्यानंतर मुख्य आरोपी विजेंद्र गुप्ताची पत्नी सुमन कुमारी हिला पाटणा येथून ठाणे ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने अटक केलेल्या आरोपींना पुन्हा पोलीस कोठडी सुनावली असून तपास वेगाने सुरू आहे.दरम्यान, पाच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे विशेष पथक आग्रा येथे दाखल झाले असून प्रश्नपत्रिका छापण्यात आलेल्या प्रिंटिंग प्रेसमध्ये चौकशी सुरू आहे. सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून प्रश्नपत्रिका छपाईसाठी कधी आली, छपाई कधी पूर्ण झाली आणि ती प्रेसमधून बाहेर कधी काढण्यात आली, याची माहिती गोळा केली जात आहे.तपासादरम्यान जप्त करण्यात आलेल्या चार प्रश्नपत्रिका जालना, वाशीम आणि लातूर येथील परीक्षा केंद्रांवर पोहोचणे पान ४ वर

# चेंबूरमध्ये स्कूलबसवर झाड कोसळून चिमुकल्याचा मृत्यू;१० लहान मुले गंभीर जखमी

मुंबई/प्रतिनिधी-मुंबईसह उपनगरात मंगळवारी (३० जून) जोरदार पावसाने हजेरी लावली. याचा वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाल्याचे पाहायला मिळाले. अशामध्ये चेंबूर परिसरात एक मोठा अपघात घडला. ११ नंबर रोडवर दुपारी शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या एका स्कूल बसवर अचानक एक अवाढव्य झाड कोसळले. या दुर्दैवी घटनेत बसमधील एका लहान मुलाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच, १० शाळकरी मुले गंभीर जखमी झाली. तसेच, यावेळी एक विद्यार्थी अडकल्याचेही सांगण्यात आले.

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. तेच, स्थानिकांकडून वारंवार तक्रारी करूनही कारवाई न केल्याचे सांगितले गेले. चेंबूर येथील ११ नंबर रोडवरून संबंधित खाजगी स्कूल बस नेहमीप्रमाणे विद्यार्थ्यांना घेऊन जात होती. याच दरम्यान रस्त्याच्या कडेला असलेले एक जुने तसेच मोठे झाड अचानक धावत्या बसवर उन्मळून पडले. झाडाच्या मोठमोठ्या फांद्या थेट बसच्या छतावर पडल्याने बसचा समोरील आणि मधला हिस्सा मोठ्या प्रमाणावर दाबला गेला. झाड कोसळताच बसमध्ये एकच आक्रोश झाल्याचे ऐकायला मिळाले. यावेळी बसमधील १० विद्यार्थ्यांना गंभीर दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत बचावकार्य सुरू केले. तसेच, जखमी मुलांना बसबाहेर काढत सर्व विद्यार्थी आणि चालकाला जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. दरम्यान, स्थानिक रहिवासी, पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान या मुलांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी शर्थीचे केले. या अपघातात ११ वर्षीय विहान श्रीवास्तव या लहान मुलाचा मृत्यू झाला आहे.

# किनवट बाजार समितीतील २०१७ ते २०२२ या कालावधीतील आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करावी-गजानन मुंडे

किनवट/प्रतिनिधी-किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीमधील दि.१ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत झालेल्या कथित आर्थिक, गैरव्यवहाराची प्रशासकीय चौकशी करुन विशेष लेखापरीक्षण करावे अशी मागणी बाजार समितीचे विद्यमान सभापती गजानन मुंडे यांनी एका निवेदनाद्वारे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे केली आहे.

सादर केलेल्या तक्रारीत विद्यमान सभापती गजानन मुंडे पाटील यांनी तत्कालीन सभापती, सचिव, संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमताने सार्वजनिक निधीचा अपहार, नियमबाह्य कर्मचारी भरती, खोटी व बनावट बिले, बाजार शुल्काची अफरातफर,जमीन विक्रीतील मंजुरीच्या अटींचे उल्लंघन, लेखापरीक्षणातील गंभीर आक्षेपांकडे दुर्लक्ष करून बाजार समितीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान केल्याचा आरोप करण्यात आला आहे. बाजार समितीकडे येणे असलेल्या अनामत रकमा संबंधित कर्मचारी व पदाधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक वसूल करण्यात आल्या नाहीत. तसेच व्यापाऱ्यांकडून वसूल करण्यात आलेली बाजार फी नियमितपणे समितीच्या अधिकृत बँक खात्यात जमा न करता ती वैयक्तिक वापरासाठी वापरण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याशिवाय लाखो रुपयांची खोटी व बनावट बिले तयार करून निधीचा अपहार करण्यात आल्याने त्या कालावधीतील सर्व व्हाउचर, बिले, बँक व्यवहार व लेखा नोंदींचे स्वतंत्र विशेष लेखापरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारीत आठवडी बाजारातील बाजार शुल्काची वसुली करून अनेक व्यापाऱ्यांना पावत्या न देता ती रक्कम समितीच्या खात्यात जमा न केल्यामुळे बाजार समितीचे मोठे आर्थिक नुकसान झाले. तसेच शेतकऱ्यांच्या हितसंरक्षणाची वैधानिक जबाबदारीही त्या कालावधीत प्रभावीपणे पार पाडण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. सन २०१७ ते २०२२ या कालावधीत करण्यात आलेली कर्मचारी भरती ही विभागीय रोस्टर पडताळणी, बिंदूनामावली, आरक्षण नियम, व्यापक जाहिरात, गुणवत्ता आधारित निवड प्रक्रिया व सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी न घेता करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. केवळ एका वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून नातलगांना लाभ मिळवून देण्यासाठी लाखो रुपयांची देवाणघेवाण झाल्याचाही दावा अर्जात करण्यात आला आहे. ही भरती अवैध घोषित करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. सेवानिवृत्त सचिव रवी तिरमनवार यांना नियमबाह्य पद्धतीने सचिव म्हणून मुदतवाढ देण्यात आल्याचा आरोप करत त्यासंदर्भातील मंजुरीची वैधता तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच सचिवांनी पगाराएवढी तीन लाख रुपयांची अनामत उचल केल्याचा दावा करत प्रवास, वेतन, भत्ते व इतर देयकांच्या नावाखाली काढण्यात आलेल्या रकमांचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

गोकुंदा येथील सर्वे क्रमांक १७८ मधील जमीन, जुनी कार्यालयीन इमारत व गोदाम विक्रीसाठी मिळालेल्या मंजुरीतील अटींचे उल्लंघन करण्यात आल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे. विक्रीतून प्राप्त झालेल्या निधीचा विनियोजित उद्देशाऐवजी इतरत्र वापर करण्यात आल्याचे नमूद करत या प्रकरणी फौजदारी कारवाईची मागणी करण्यात आली आहे. तसेच सुमारे रु. १ कोटी ७३ लाख ६९ हजार इतक्या निधीच्या वापराबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. तक्रारीत संचालक व्यंकटराव नेमानिवार यांनी यापूर्वीही जमीन विक्री व कर्मचारी भरतीबाबत शासनाकडे अनेक तक्रारी केल्याचा उल्लेख आहे. त्या सर्व तक्रारींची एकत्रित चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. लेखापरीक्षण अहवालात नमूद पान ४ वर



# महापालिकेची तहकूब सर्वसाधारण सभा गुरुवारी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची तहकूब करण्यात आलेली अर्थसंकल्पीय सभा गुरुवार दि.२ जुलै रोजी दुपारी ४ वाजता कै.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह स्टेडीयम परिसर येथे आयोजित करण्यात आली आहे. महापालिकेची अर्थसंकल्पीय सभा दि.३० एप्रिल रोजी तहकूब करण्यात आली होती. त्यानंतर आचार संहितेमुळे दि.३० जून रोजी आयोजित करण्यात आली होती. परंतु काही कारणास्तव पुन्हा स्थगित करण्यात आली असून आता दि.२ जुलै रोजी आयोजित करण्यात आली आहे.

# न्यायव्यवस्थेतील ‘आशेचा किरण’


**पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे १ मे हा महाराष्ट्र दिन साजरा होत असतानाच, एका साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर झालेला पाशवी अत्याचार आणि तिची अत्यंत निर्घृणपणे केलेली हत्या, ही केवळ एका जिल्ह्याला किंवा राज्याला नाही, तर संपूर्ण देशाला हादरवून टाकणारी आणि मानवतेला काळिमा फासणारी घटना होती. या अमानुष कृत्याने जनमानसात तीव्र संतापाची लाट उसळली होती. अलीकडच्या काळात महिला आणि बालकांवरील लैंगिक शोषणाच्या व अत्याचाराच्या घटना ज्या प्रकारे दिवसेंदिवस उघडकीस येत आहेत, ते पाहता समाज नेमका कोणत्या दिशेने चालला आहे?, असा गंभीर प्रश्न निर्माण होतो. अशा अंधकारमय आणि संतापजनक वातावरणात नसरापूर प्रकरणाचा अवघ्या ६० दिवसांत लागलेला निकाल हा कोसळलेल्या न्यायव्यवस्थेवरचा विश्वास पुन्हा एकदा जागवणारा आणि सर्वसामान्यांसाठी एक मोठा ‘आशेचा किरण’ ठरणारा ठरला आहे. याबद्दल तपास यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेचे जितके कौतुक करावे तितके थोडेच आहे.दिल्लीतील ऐतिहासिक आणि अंगावर काटा आणणाऱ्या ‘निर्भया’ हत्याकांडानंतर देशात महिला अत्याचारांविरुद्ध अत्यंत कठोर कायदे करण्यात आले. कायद्यात बदल झाले, शिक्षेचे प्रमाण वाढवले गेले; तरीही अशा विकृत आणि अमानवी घटना थांबताना दिसत नाहीत. यामागचे मुख्य कारण म्हणजे गुन्हे घडल्यानंतर तपास आणि न्यायव्यवस्थेत लागणारा प्रचंड विलंब होय. ‘‘न्यायाला झालेला विलंब म्हणजे न्याय नाकारणे‘‘ हा न्यायशास्त्राचा नियम आपण वारंवार ऐकतो. हाच विलंबाचा काळ गुन्हेगारांचे मनोबल वाढवतो आणि पीडितांच्या जखमांवर मीठ चोळतो, असा आरोप वारंवार केला जात होता. महाराष्ट्रातही नसरापूरच्या आधी बदलापूर येथील चिमुरड्यांवर झालेला अत्याचार असो, की पुण्यातील एका बस स्थानकावर महिलेवर झालेला प्रसंग असो; अशा घटनांची मालिकाच समोर येत होती. यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा धाक संपला आहे की काय, अशी भीती नागरिकांच्या मनात घर करून बसली होती. परंतु, नसरापूर प्रकरणात पुणे पोलिसांनी आणि न्यायव्यवस्थेने जी तत्परता दाखवली, ती देशातील इतर तपास यंत्रणांसाठी एक वस्तुपाठ ठरली आहे. सामान्यतः पोलीस तपास, पुराव्यांची गोळाबेरीज आणि सबळ आरोपपत्र (चार्जशीट) तयार करण्यासाठी पोलिसांना महिनोन् महिने, कधीकधी तर वर्षे लागतात. परंतु पुणे पोलिसांनी या संवेदनशील प्रकरणाचे गांभीर्य ओळखून अवघ्या १५ दिवसांत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. पोलिसांच्या या जलद गतीने केलेल्या तपासामुळे खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवणे शक्य झाले.यापुढचा मैलाचा दगड विशेष न्यायालयाचे न्यायमूर्ती एस. आर. साळुंखे यांनी रोवला. न्यायमूर्ती साळुंखे यांनी या खटल्याचे गांभीर्य लक्षात घेऊन, एकही सुट्टी न घेता अवघ्या ६० दिवसांत या संपूर्ण खटल्याचा निकाल दिला. एका संवेदनशील आणि अमानुष प्रकरणाचा इतक्या कमी कालावधीत निकाल लागणे ही न्यायव्यवस्थेच्या इतिहासातील एक दुर्मिळ आणि कौतुकास्पद घटना आहे. जेव्हा न्यायाधीशांसारखे उच्चपदस्थ अधिकारी कोणतीही सुट्टी न घेता अहोरात्र काम करतात, तेव्हा ते केवळ त्यांचे कर्तव्य बजावत नसतात, तर समाजाला एक मोठा संदेश देत असतात की, शोषित आणि पीडितांना न्याय देण्यासाठी व्यवस्था कटिबद्ध आहे. पोलीस यंत्रणेने दाखवलेली तत्परता आणि न्यायमूर्ती साळुंखे यांनी दाखवलेली कर्तव्यनिष्ठा या दोन्हीचा मिलाफ झाल्यामुळेच या चिमुरडीला आणि तिच्या कुटुंबाला वेळेत न्याय मिळू शकला.हा निकाल एका बाजूला आशेचा किरण दाखवत असताना, दुसऱ्या बाजूला देशातील आणि राज्यातील इतर प्रलंबित खटल्यांमुळे निर्माण होणारी चिंता पूर्णपणे मिटत नाही. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण सध्या मोठ्या प्रमाणावर गाजत आहे. मात्र, या प्रकरणात न्यायासाठी होत असलेल्या विलंबामुळे सर्वसामान्यांच्या मनात पुन्हा एकदा अस्वस्थता आणि संतापाची भावना निर्माण होत आहे. गुन्हेगार कितीही प्रभावशाली असला तरी त्याला तात्काळ शिक्षा झाली पाहिजे, ही जनतेची अपेक्षा असते; पण जेव्हा प्रकरणांना अवाजवी वेळ लागतो, तेव्हा यंत्रणेच्या हेतूवर शंका उपस्थित होऊ लागतात. आजच्या घडीला आपली संपूर्ण यंत्रणा आणि न्यायव्यवस्था एका वेगळ्याच संशयाच्या भोवऱ्यात सापडल्याचे चित्र आहे. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील राजकीय खटला. गेल्या चार वर्षांपासून हा खटला प्रलंबित आहे. सर्वोच्च न्यायालय या प्रकरणात केवळ ‘तारखांवर तारखा’ देत आहे, मात्र अंतिम निकाल काही येत नाही. या प्रकरणात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे राज्यातील दोन मोठे आणि महत्त्वाचे राजकीय पक्ष अडकले आहेत. संपूर्ण राज्याचे राजकारण यावर अवलंबून असताना, देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने अशा संवेदनशील राजकीय खटल्यात त्वरित निर्णय देणे अपेक्षित होते. परंतु, तिथे मिळणारा विलंब आणि दुसरीकडे नसरापूर सारख्या गंभीर प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने ६० दिवसांत दिलेला निकाल, या दोन गोष्टींमधील विरोधाभास ठळकपणे जाणवतो. राजकीय खटल्यांच्या प्रलंबिततेमुळे न्याय यंत्रणेवर सातत्याने राजकीय दबावाचे आरोप होत असताना, न्यायमूर्ती साळुंखे यांनी घेतलेला निर्णय सर्वसामान्यांचा न्यायदेवतेवरील विश्वास अधिक दृढ करणारा ठरतो.अशा परिस्थितीत, प्रशासन आणि न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत होत असताना, नसरापूरच्या प्रकरणाने हा विश्वास द्विगुणित केला आहे. गुन्हेगारांना वेळेत शिक्षा झाली, तरच समाजात कायद्याचा धाक निर्माण होईल आणि अशा विकृत प्रवृत्तींना आळा बसेल. पुणे पोलीस आणि न्यायमूर्ती साळुंखे यांचे हे पाऊल पथदर्शी आहे. जर प्रत्येक संवेदनशील आणि अमानुष प्रकरणात अशीच गती आणि संवेदनशीलता दाखवली गेली, तर देशातील गुन्हेगारीचे प्रमाण नक्कीच कमी होईल. नसरापूरच्या पीडितेला न्याय मिळवून देणाऱ्या या संपूर्ण यंत्रणेचे त्रिवार अभिनंदन आणि हीच गतिमानता भविष्यातही कायम राहो, हीच अपेक्षा!**

# मतदार यादी दुरुस्ती की, लोकशाहीच्या मुळावरच घाव?

## एस.आय.आर. आणि भारतीय लोकशाहीसमोरील गंभीर प्रश्न!

भारतीय लोकशाहीची खरी ताकद ही मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर उभ्या असलेल्या सामान्य नागरिकामध्ये असते. परंतु त्याने ती ताकद ओळखली पाहिजे. नेत्यांनीही समृद्ध लोकशाहीसाठी जनमानस उंचावत उत्कृष्ट नागरिक व मतदार कसे निर्माण होतील, याची पायाभरणी करणे आवश्यक असते. मतदार हा लोकशाहीचा केंद्रबिंदू आहे. म्हणूनच देशातील मतदार यादीतील प्रत्येक नाव हे केवळ एक नाव नसून भारतीय संविधानावरील विश्वासाचे प्रतीक आहे. परंतु, द इकॉनॉमिक टाइम्समध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, एसआयआर अभियानातून देशभरातील सुमारे पाच कोटी ऐंशी लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. या आकडेवारीमध्ये मृत, दुबार किंवा बोगस मतदारांची नावे असू शकतात. मतदार यादी शुद्ध करणे ही आवश्यक आणि स्वागतार्ह प्रक्रिया आहे. परंतु या प्रक्रियेत एकही जीवंत, पात्र आणि प्रामाणिक मतदार वंचित राहू नये, ही लोकशाही व्यवस्थेतील मूलभूत अपेक्षा आहे.

बिहारमध्ये अनेक नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळल्याची उदाहरणे देशाने पाहिली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी अशा नागरिकांना समोर आणून एसआयआर प्रक्रियेवरून निवडणुक आयोगाला प्रश्न उपस्थित केले. पश्चिम बंगालमध्येही मतदार यादीबाबत अनेक आक्षेप आणि तक्रारी समोर आल्या. या घटनांमुळे देशभरातील सामान्य मतदारांच्या मनात चिंता निर्माण होणे स्वाभाविक आहे. वरील प्रक्रियेचा विचार करता, आज सर्वात मोठा प्रश्न समाजातील शेवटच्या घटकाचा आहे. एखाद्याचे  च्या मतदार यादीत नाव नसेल, त्यांच्याकडे आई-वडिलांचे दाखले उपलब्ध नसतील, एखादी व्यक्ती अनाथ असेल, भटक्या-विमुक्त जमातीतील असेल आणि त्याचे वास्तव्य कायमस्वरूपी नसेल, स्थलांतरित मजूर असेल किंवा आयुष्यभर एका गावातून दुसऱ्या गावात स्थलांतर करत राहिली असेल, तर अशा नागरिकांचे नावे मतदार यादीत समाविष्ट होणार की नाही ? आणि मतदार यादीत असतील तर त्यांची नावे कागदपत्रे आणि इतर तांत्रिक मुद्द्यांच्या आधारे वगळली तर ? मग त्यांच्या मतदानाच्या अधिकाराचे काय? त्यांचे नागरिक म्हणून असलेले स्थान कोणत्या प्रक्रियेद्वारे सुरक्षित राहणार? असे अनेक प्रश्न डोळ्यासमोर आहेत.



भारतीय संविधान कोणत्याही नागरिकाला त्याच्या आर्थिक, सामाजिक किंवा शैक्षणिक परिस्थितीच्या आधारे वेगळे वागवत नाही. मग कागदपत्रांच्या अभावामुळे एखाद्या पात्र नागरिकाला मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहण्याची भीती निर्माण होणे ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे. कोणत्याही पात्र मतदाराचे नाव अन्यायाने कमी होणार नाही, अशी अपेक्षा देशातील नागरिकांची आहे. तरीदेखील जनतेच्या मनात निर्माण झालेली अस्वस्थता आणि शंका दूर करणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. विशेषतः ज्यांच्याकडे जुनी कागदपत्रे नाहीत, ज्यांचे आई-वडील हयात नाहीत, ज्यांच्या आईवडलांचे नाव २००२ च्या मतदार यादीत नाही, जे अनाथ आहेत, भटक्या-विमुक्त समाजातील आहेत किंवा अत्यंत वंचित परिस्थितीत जीवन जगत आहेत, अशा नागरिकांसाठी सुलभ, न्याय्य आणि मानवी दृष्टिकोनातून पर्यायी व्यवस्था उभी करणे आवश्यक आहे. लोकशाही केवळ मतदानाची प्रक्रिया नसते; ती प्रत्येक नागरिकाला समान सन्मान देण्याची व्यवस्था असते. मतदार यादी दुरुस्त होणे आवश्यक आहे, पण त्या प्रक्रियेत एकही पात्र नागरिक लोकशाहीच्या मुख्य प्रवाहाबाहेर जाऊ नये. कारण लोकशाहीची खरी ताकद मतदारांची संख्या नव्हे, तर प्रत्येक मतदाराचा विश्वास असतो. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून माझी भूमिका स्पष्ट आहे, मतदार यादी शुद्ध असावी, पण त्यासाठी एकही पात्र भारतीय नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये.

**प्रा.सुदीपकुमार बारडकर**
भोकर.

निवडणूक आयोगाने प्रत्येक नागरिकाचा अधिकार सुरक्षित राहील, अशी विश्वासार्ह आणि संवेदनशील यंत्रणा उभारावी. कारण लोकशाही टिकते ती मतदाराच्या विश्वासावर; आणि तो विश्वास टिकवणे हीच आपल्या लोकशाहीची सर्वात मोठी जबाबदारी आहे. मतदार यादीतील प्रत्येक नाव म्हणजे भारतीय लोकशाहीचा एक जिवंत श्वास आहे. तो श्वास कायम राहिला, तरच लोकशाही कायम राहील.

परंतु शेवटी एक प्रश्न मनात येतो, देशात वास्तव्य करणाऱ्या आणि जीवंत असणाऱ्या नागरिकांची नावे वरील प्रक्रियेनंतर जेव्हा मतदार यादीतून रद्द होतील तेव्हा त्यांच्या नागरिकत्वाचे काय ? याचेही उत्तर अपेक्षित आहे.

# पत्रकारांना मारण्याची धमकी देणारे खा.संजय दिना पाटील यांना सरकार कोणती कठोर शिक्षा देणार?

उत्तर-पूर्व मुंबईचे शिवसेना खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ २५ जून २०२६ ला केली.माध्यमांचे काही प्रतिनिधी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर गुरुवारी प्रतिक्रिया घेण्यासाठी गेले असता, खासदार संजय दिना पाटील यांना प्रश्न विचारला तुमची मुलगी राजुल पाटील या अजूनही उद्धव ठाकरे सोबतच का राहिल्या, असा प्रश्न पत्रकारांनी विचारताच पाटील संतापले व पाटील यांच्या जिभेवरील ताबा सुटला आणि त्यांनी पत्रकारांना कॅमेरा बंद करण्यास सांगितले.खूप दिवस सहन केले,आता उगाच डोक्यात जाऊ नका.माझ्या घराखाली तुम्हाला उभे करतो. जेवायला देतो.मी जे बोलत आहे ते रेकॉर्ड करा.कमिशनरकडे जाऊन कम्प्लेंट करा अशा पध्दतीने पाटील यांनी थेट पत्रकारांनाच अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.परत आलात तर मारून पाठवेन, हे मी तुम्हाला पोलिसांसमोर सांगतोय...तुम्हाला काय करायचं ते करा, अशी अरेरावीची भाषा पाटील यांनी वापरली.तसेच,याची तक्रार पोलिसांकडे केली तरीही मला फरक पडणार नाही.पुन्हा असे केलेत तर तुम्ही पत्रकार आहात आणि मी खासदार आहे हे विसरून जाईन, असा गर्भित इशाराही त्यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींना दिला.

संजय पाटील असेही म्हणतात,माझ्या वाटेला जाणाऱ्यांना मी एकतर हॉस्पिटलमध्ये पाठवेल नाहीतर स्मशानात! आमच्या घराण्यात आम्ही एकेकाळी ५ लोकांचे खून पाडलेत,अशी फुशारकी मारली होती.यावरून स्पष्ट होते की, खा.संजय दिना पाटील गुंड, क्रिमिनल, भ्रष्टाचारी, खुनी, बेजबाबदार प्रवृत्तीचे व्यक्ती आहेत. देशातील प्रत्येक पत्रकारांना लोकप्रतिनिधींना उलटसुलट प्रश्न विचारण्याचा संपूर्ण अधिकार आहे आणि असतो.कारण प्रत्येक प्रश्नातुनच उत्तर मिळत असते आणि




निराकरण होते त्यालाच पत्रकारिता म्हणतात.परंतु कलंकीत आणि गुंड खासदार संजय दिना पाटील यांनी आपली संपूर्ण हद्दपार करून माध्यमांच्या प्रतिनिधींवर चिखलफेक्र केली आहे ही चिखलफेक्र देश, राज्य, राज्यातील जनता आणि चौथास्तंभ कधीच विसरणार नाही. कारण लोकप्रतिनिधी जर मारण्याची धमकी देत असेल तर ही कसली लोकशाही म्हणावी आणि कसले खासदार म्हणावे. खासदार संजय दिना पाटील यांच्या धमकीमुळे आज माध्यम किंवा पत्रकारांमध्ये असामंजस्यतेचे वातावरण निर्माण झाले आहे.लोकप्रतिनिधींनी लक्षात ठेवले पाहिजे की, माध्यम किंवा पत्रकार देशापुढे सत्य परिस्थिती आणण्यासाठी मरायला सुध्दा भीत नाही ही बाब खासदार संजय दिना पाटील यांनी लक्षात ठेवली पाहिजे.देशातील अनेक पत्रकारांनी व माध्यमांच्या प्रतिनिधींनी युद्धजन्य परिस्थिती,भुकँप,सुनामी, आपात्कालीन परिस्थिती, आंदोलने, भयावह घटना अशा अनेक कठीण प्रसंगाच्या ठिकाणी जाऊन सतत कार्य करीत असतात व करीत आहे आणि समाजापुढे व देशापुढे संपूर्ण सत्यता प्रकाशित व्हावी यासाठी आपल्या प्राणांची आहुती सुद्धा देतात. ही बाब संजय दिना पाटील यांनी विसरू नये. संजय पाटील यांना लोकांनी निवडून दीले त्यामुळे ते खासदार झाले आणि आता त्यांना खासदारकीची जास्त गर्मी चढल्याचे दिसून येते.आता प्रश्न आहे की, माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे खासदार संजय दिना पाटील यांची गुंडगिरीची गर्मी कोणत्या पध्दतीने उतरवितात.माझ्यामते संजय दिना पाटील यांच्या गल्लिच्छ वागणूकीमुळे व गुंडागर्दीच्या भाषेमुळे त्यांना खासदारकीच्या पदावर रहाण्याचा तिळमात्र अधिक नाही.कारण पाटील यांनी चौथ्यास्तंभाला व लोकशाहीला मलीन करण्याचे काम केले आहे.पाटील यांच्या दिलगिरीवर (माफीनाम्यावर)सरकार त्यांना जर क्लीन चिट देत असेल तर ही लोकशाहीची जाहीर हत्याच म्हणावी लागेल.कारण आज जर सरकारने संजय दिना पाटील यांच्यावर कठोर कारवाई केली नाही व मोकळे सोडले तर अनेक लोकप्रतिनिधी त्यांच्याच रांगेत बसायला वेळ लागणार नाही हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे संजय दिना पाटील यांना ताबडतोब खासदार (लोकप्रतिनिधी) पदावरून बरखास्त करायला हवे. त्याचप्रमाणे माध्यमांच्या प्रतिनिधींना दिलेल्या धमकीचा व्हिडिओ लक्षात घेता ताबडतोब गुन्हा दाखल करून कठोर शिक्षा ठोठावली पाहिजे.कारण आता संजय दिना पाटील खासदार नसून राज्यासह देशाचा मोठे गुन्हेगार आहेत. माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस यांनी नुकतेच निर्देश दिले की, महाराष्ट्रात पत्रकारांवर वाढते हल्ले व धमक्यांच्या घटना लक्षात घेता महाराष्ट्र पत्रकार व वृत्त माध्यम कर्मचारी संरक्षण कायदा २०१७ नुसार पत्रकारांवरील हल्ला हा दखल पात्र व अजामीनपात्र गुन्हा आहे.अशा पध्दतीचे निर्देश पोलीस विभाग, गृहविभाग व सर्व जिल्हाधिकाऱ्यांना लागू होतात.याच कायद्याच्या अंतर्गत संजय दिना पाटील यांना ताबडतोब कठोर शिक्षा द्यायला हवी.जय हिंद.

**रमेश लांजेवार**
नागपूर

# दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी ५२ लाखांचे सहाय्यक साहित्य वितरित

माहूर/प्रतिनिधी-केंद्र सरकारच्या दिव्यांग शक्ती सक्षमीकरण विभाग, सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय तसेच गोपु महामुने मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने माहूर शहरातील बालाजी मंगल कार्यालय येथे सामाजिक सक्षमीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तब्बल ५२ लाख रुपये किमतीचे विविध प्रकारचे सहाय्यक साहित्य ४३९ दिव्यांग लाभार्थ्यांना मोफत वितरित करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन आ. भीमराव केराम यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना आ. केराम म्हणाले की, दिव्यांग बांधवांना स्वावलंबी व सक्षम जीवन जगता यावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. आठ महिन्यांपूर्वी तालुकास्तरावर दिव्यांग नागरिकांसाठी नोंदणी व वैद्यकीय तपासणी शिबिर घेण्यात आले होते. त्यामधून पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांची निवड करून भारत सरकारच्या एडीआयपी आणि आरव्हीआय योजनेंतर्गत विविध सहाय्यक उपकरणांचे मोफत वितरण करण्यात आले. किनवट-माहूर मतदारसंघात एवढ्या मोठ्या प्रमाणावर दिव्यांग बांधवांना सहाय्यक साहित्य वितरित करण्याची ही पहिलीच वेळ असून, या उपक्रमामुळे शेकडो कुटुंबांना मोठा आधार मिळणार आहे. शिबिरात दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी व्हीलचेअर, ट्रायसायकल, श्रवणयंत्र, काठी तसेच अन्य आवश्यक सहाय्यक उपकरणांचे वितरण करण्यात आले. लाभार्थ्यांनी या



उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत आ. भीमराव केराम, गोपु महामुने मित्र मंडळ तसेच संबंधित विभागाचे आभार मानले. यावेळी संजय राठोड, आनंद मच्छेवार, अनिल वाघमारे, कांताराव घोडेकर, निळकंठ मस्के, शोभाताई महामुने, स्वाती आडे, पद्मा गिन्हे, लक्ष्मीताई नरवाडे यांच्यासह सहाय्यक साहित्य वितरणासाठी आलेले तांत्रिक अधिकारी डॉ. शुभम खंदारे, डॉ. सुषा कांबळे, नागेश कुलकर्णी आणि राहुल मोरे उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# हदगाव शहरासह तालुक्यात कोट्यवधींच्या विकासकामांवर 'नो इन्फॉर्मेशन बोर्ड'!

## नेमके काय लपवले जात आहे...?

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहर व तालुक्यात शासनाच्या विविध योजनांतून कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू असताना बहुसंख्य कामांच्या ठिकाणी अनिवार्य माहिती फलकच नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. त्यामुळे या कामांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असून नेमके काय लपवले जात आहे? असा सवाल नागरिक उपस्थित करू लागले आहेत.

शासनाच्या नियमांनुसार प्रत्येक सार्वजनिक कामाच्या ठिकाणी कामाचे नाव, मंजूर निधी, योजना, कंत्राटदाराचे नाव, संबंधित अभियंता, कामाची मुदत व मंजुरीची तारीख नमूद असलेला माहिती फलक लावणे बंधनकारक आहे. मात्र हदगाव शहर व तालुक्यात सुरू असलेल्या अनेक सिमेंट रस्ते व इतर विकासकामांवर असे फलक दिसत नसल्याने नियमांना जाणीवपूर्वक हरताळ फासला जात असल्याची चर्चा रंगू लागली आहे.विशेष म्हणजे, अनेक रस्त्यांच्या कामांचा दर्जाही संशयास्पद असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही ठिकाणी काम पूर्ण होण्यापूर्वीच तडे जाणे, पृष्ठभाग उखडणे आणि निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. स्वतंत्र तांत्रिक तपासणी झाल्यास कोट्यवधी रुपयांच्या कामांतील अनियमिततेचे मोठे प्रकरण उघड होण्याची शक्यता स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे. स्थानिकांच्या आरोपानुसार, काही कंत्राटदारांना राजकीय वरदहस्त असल्यामुळे संबंधित विभागातील अधिकारीही कामाच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष करत असल्याची चर्चा आहे.

कंत्राट एका व्यक्तीच्या नावावर असले तरी प्रत्यक्षात दुसऱ्याच प्रभावशाली व्यक्तीमार्फत कामे केली जात असल्याचा आरोपही होत आहे. त्यामुळे कामांचा दर्जा खालावत असतानाही देयके मात्र वेगाने मंजूर होत असल्याची कुजबूज प्रशासनात ऐकायला मिळत आहे. या पूर्वी काही ठराविक शहरातील अनेक प्रभागांमध्ये प्रत्यक्ष गरज नसलेल्या ठिकाणी सिमेंट रस्त्यांची कामे करण्यात आली, तर अत्यावश्यक



प्रभागांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. विकासकामांच्या नियोजनात पारदर्शकता नसल्याने निधीचा वापर नेमका कोणत्या निकषांवर झाला, याबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणात जबाबदारी निश्चित करण्याचा प्रयत्न केला असता नगरपालिका प्रशासनाने संबंधित कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होत असल्याचे सांगितले. तर सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता साहेब दौऱ्यावर आहेत हेच नेहमीचे उत्तर मिळाल्याने अधिकृत भूमिका समोर आली नाही. त्यामुळे दोन्ही विभाग जबाबदारी एकमेकांवर ढकलत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, माहिती फलक लावावेत, कामांची गुणवत्ता तपासावी आणि संपूर्ण माहिती सार्वजनिक करावी, यासाठी नागरिकांनी दिलेली निवेदने प्रशासनाने गांभीर्याने घेतली नसल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या निवेदनांची केराच्या टोपलीतच रवानगी होते का? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.आता जिल्हा प्रशासनाने या सर्व विकासकामांची उच्चस्तरीय व स्वतंत्र तांत्रिक चौकशी करून माहिती फलक न लावणाऱ्या कंत्राटदारांवर, कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी हदगावकरांकडून होत आहे. अन्यथा विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपव्यय झाल्याच्या संशयाला अधिक बळ मिळणार असल्याची प्रतिक्रिया स्थानीय नागरिकातून व्यक्त होताना दिसून येत आहे.

# गावठी पिस्टल बाळगणाऱ्या इसमास अटक

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील चौफाळा भागात गावठी पिस्टल बाळगणाऱ्या एका इसमास इतवारा पोलीसांनी सोमवारी सायंकाळी अटक केली आहे.

चौफाळा भागातील एका तरुणाकडे गावठी पिस्टल असल्याची गोपनीय माहिती पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली इतवारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक रामेश्वर खनाळ,



फौजदार संजय शिंदे, फौजदार जळबाजी गायकवाड व पोलीस कर्मचाऱ्यांनी चौफाळा भागातून हर्ष जगदीश कोकरे रा.भोई गल्ली यास अटक केली. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्या जवळून एक गावठी पिस्टल आढळून आले. पोलीसांनी सदरील गावठी पिस्टल जप्त केले आहे. याप्रकरणी हर्ष कोकरे याच्या विरुध्द इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उर्दू घर, लिंबगाव येथे एसआयआर सुनावणी केंद्र सुरु करण्याची काँग्रेसची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहर व जिल्ह्यात ३० जूनपासून सुरू होणाऱ्या विशेष मतदार यादी सुधारणा (एसआयआर) कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सोयीसाठी शहरात अधिक सुनावणी केंद्रे स्थापन करण्याची मागणी काँग्रेसने जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष महेश देशमुख यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांची भेट घेवून निवेदनाद्वारे केली आहे.

एसआयआर मोहिमेंतर्गत ३० जूनपासून बूथस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन ई-फॉर्मचे वितरण करणार आहेत. २००२ च्या विशेष मतदार यादी सुधारणा प्रक्रियेत ज्यांची नावे समाविष्ट झाली नव्हती किंवा मतदार यादीतील तपशीलात विसंगती आहे, अशा नागरिकांना नोटीस देऊन आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास सांगितले जाणार आहे. त्यानंतर संबंधितांची बाजू ऐकून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार आहे.या प्रक्रियेदरम्यान नागरिकांना गैरसोय होऊ नये, यासाठी नांदेड उत्तर व दक्षिण विधानसभा मतदारसंघात अतिरिक्त एसआयआर सुनावणी केंद्रे सुरू करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. जुने शहर व देगलूर नाका परिसरातील मोठी लोकसंख्या लक्षात घेऊन उर्दू घर येथे स्वतंत्र सुनावणी केंद्र सुरू करावे, तसेच उत्तर नांदेडच्या ग्रामीण भागातील मतदारांच्या सोयीसाठी लिंबगाव येथेही सुनावणी केंद्र कार्यान्वित करावे, अशी मागणी करण्यात आली.शिष्टमंडळात काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष महेश देशमुख, अल्पसंख्याक शहराध्यक्ष अब्दुल अझीझ कुरेशी, नगरसेवक बाबूभाई खोखेवाले, माजी नगरसेवक मुन्तजिब, सय्यद शेर अली, जावेद चाऊस, वाजिद जागीरदार आणि जेडी जावेद भाई यांचा समावेश होता. निवेदनावर प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेऊन नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी अपेक्षाही शिष्टमंडळाने व्यक्त केली.

## ५२ हजार रुपयांचा गांजा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-देगलूर नाका भागातील पशु वैद्यकीय रुग्णालयाच्या मोकळ्या जागेत गांजा विक्री करणाऱ्या एका इसमास स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी सोमवारी अटक केली.

स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले, फौजदार महेश कोरे व पोलीस कर्मचाऱ्यांनी सोमवारी कारवाई करुन मो. आमेर मो.इस्माईल रा.बोधन यास अटक केली. त्याच्या जवळून ५२ हजार रुपयांचा गांजा जप्त केला आहे.

# मुंबई-हैदराबाद 'वंदे भारत स्लीपर' सुरु करण्याची खा.अशोकराव चव्हाण यांची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खा.अशोकराव चव्हाण यांनी मनमाड- छत्रपती संभाजीनगर- नांदेड मार्गे मुंबई-हैदराबाद 'वंदे भारत स्लीपर' रेल्वे सुरु करण्याची मागणी केली आहे. त्यांनी यासंदर्भात रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र लिहिले आहे.



नजीकच्या काळात भारतीय रेल्वेकडून देशातील प्रमुख शहरांना 'वंदे भारत स्लीपर' रेल्वे सेवेने जोडले जाणार आहे. याच अनुषंगाने खा. अशोकराव चव्हाण यांनी ही मागणी केली आहे. आपल्या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राच्या सोयीच्या दृष्टीने मनमाड- छत्रपती संभाजीनगर-नांदेड मार्गे मुंबई-हैदराबाद 'वंदे भारत स्लीपर' रेल्वे सुरु करण्याची आवश्यकता आहे. ही रेल्वे सेवा सुरु झाल्यास प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल व महाराष्ट्रातील एका विस्तृत पट्ट्याला या अत्याधुनिक आणि प्रीमियम सेवेचा थेट लाभ मिळेल. रेल्वेमंत्र्यांनी या मागणीवर सकारात्मक विचार करावा, अशीही विनंती त्यांनी केली आहे.

# स्पर्धा परीक्षेतून निवड झालेले नऊ केंद्रप्रमुख रुजू

कंधार/प्रतिनिधी-विभागीय स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून कंधार पंचायत समितीच्या शिक्षण विभागात नऊ केंद्रप्रमुख पदावर रुजू झाले असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी वसंत मेटकर यांनी दिली.

रुजू झालेले नऊ केंद्रप्रमुख आंबुलगा केंद्र प्रदीप भानुदासराव गित्ते, बोळका-प्रमोद शेलार, दिग्रस-गंगणे गजानन, कौठा-सुधीर एकाळे,गोणार-श्री गजानन पवितवार, उस्माननगर-बालाजी बालाघाटे, बारूळ-अविनाश पांचाळ, कुरूळा - प्रदीप शिंदे,फुलवळ-विनोद माने, अशी आहेत. गटशिक्षणाधिकारी वसंत मेटकर यांनी ठाम विश्वास व्यक्त केला की, विद्येच्या क्षेत्रात पारंगत असणारी ही नवी फळी कंधार तालुक्याला नांदेड जिल्ह्याच्या शैक्षणिक नकाशावर प्रथम क्रमांकावर विराजमान करेल. गुणवत्ता, शिस्त आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांचा त्रिवेणी संगम येथे पाहायला मिळेल. असा विश्वास व्यक्त केला.वरील नऊ केंद्र प्रमुखांनी देखील कंधारचे नाव संपूर्ण जिल्ह्यात दैदिप्यमान करण्याचा संकल्प बोलून दाखवला. कंधारच्या प्रत्येक शाळेत गुणवत्तेचा झेंडा फडकवू, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.यावेळी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघटनेचे एन.एम. वाघमारे, मुनेश शिरसीकर व तानाजी कुटे यांच्या हस्ते सत्कारमूर्तींना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित केंद्रप्रमुख प्रवीण पाटील यांनी केले.

# खुरगाव येथे ६ जुलै रोजी भव्य वृक्षारोपण आणि रक्तदान शिबिराचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या जन्मदिनानिमित्त ६ जुलै रोजी भव्य वृक्षारोपण आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

भिक्खू संघाच्या उपस्थितीत प्रशिक्षण केंद्राच्या पार्किंग परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम, अष्टपुरस्कार प्रदान, चिवरदान, ग्रंथदान, भोजनदान, धम्मदेसना, वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन आदी कार्यक्रम होणार असून विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने देण्यात दिली. ऋषिपठण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भव्य वृक्षारोपण आणि रक्तदान शिबिराचे आयोजन ६ जुलै रोजी सोमवारी सकाळी १० वाजल्यापासून सायंकाळी सहा वाजेपर्यंत करण्यात आले आहे. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे.

## जाहीर प्रगटन

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय हदगाव**

जा.क्र.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंद/सिआर- दिनांक- /०६/२०२६

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी,हदगाव यांचे न्यायालयात**

जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा-२०२३ मध्ये
कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज क्र.

**विरुद्ध**

जन्म-मृत्यू, विवाह नोंदणी तथा वैद्यकीय अधिकारी उ.जि.रु.हदगाव

विषय - जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये यांची जन्माची नोंद घेण्याकरीता आदेशीत करणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदार **अश्विनी सटवाजी गिरामे** रा.**थोरावा** ता.वसमत जि.हिंगोली वय २५ वर्ष यांनी त्यांचा **मुलगा नामे शिवांश सटवाजी गिरामे याचा दि.१५.१२.२०२३** रोजी हदगाव येथे जन्म झाला असून सदर जन्म-मृत्यू नोंद नोंदणी सुधारणा कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरीता जन्म-मृत्यू विवाह नोंदणी तथा वैद्यकीय अधिकारी उ.जि.रु.हदगाव ता.हदगाव जि.नांदेड यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी यांची जन्माची नोंद जन्म-मृत्यू,विवाह नोंदणी तथा वैद्यकीय अधिकारी उ.जि.रु.हदगाव ता.हदगाव जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाची दि.१५.१२.२०२३ रोजीची जन्माची नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून १५ दिवसामध्ये या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजरी न केल्यास सदरच्या अर्जावर गुणवत्तेनुसार आदेश पारीत करण्यात येईल.

स्वाक्षरित/-

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी,हदगाव**

# डॉक्टर लेनमध्ये कचऱ्याचे साम्राज्य; नागरिकांसह रुग्णांचे आरोग्य धोक्यात

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील अत्यंत गजबजलेल्या आणि आरोग्याशी संबंधित केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉक्टर लेन परिसराला सध्या कचराकोंडीचा सामना करावा लागत आहे. येथील भक्ती हॉस्पिटलजवळ असलेल्या साईप्रसाद परिवाराच्या किचन शेजारी राजरोसपणे कचरा टाकून संपूर्ण परिसर घाण केला जात आहे. यामुळे या भागात प्रचंड दुर्गंधी पसरली असून, नागरिक आणि रुग्णांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

वास्तविक पाहता डॉक्टर लेन हा परिसर रुग्णालये आणि क्लिनिक्समुळे अत्यंत संवेदनशील मानला जातो. मात्र, साईप्रसाद किचन शेजारील मोकळ्या जागेत दररोज मोठ्या प्रमाणात कचरा आणून टाकला जात आहे. यामध्ये ओला व सुका कचरा, प्लॉस्टिकच्या पिशव्या आणि अन्नपदार्थांचा समावेश असतो. हा कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने तो सडून दुर्गंधी सुटली आहे. तसेच त्यावर डास आणि माश्यांचा प्रादुर्भाव वाढला आहे. भक्ती हॉस्पिटलमध्ये येणारे रुग्ण, त्यांचे नातेवाईक आणि साईप्रसाद परिवाराच्या किचनमध्ये येणाऱ्या नागरिकांना या घाणीचा आणि दुर्गंधीचा तीव्र त्रास सहन करावा लागत आहे. आधीच आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना या अस्वच्छतेमुळे संसर्गजन्य आजार होण्याचा धोका निर्माण झाला आहे. महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने याकडे त्वरित लक्ष देवून येथील कचरा हटवावा आणि यापुढे येथे कोणीही कचरा टाकणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिक आणि डॉक्टरांकडून होत आहे.

# एकल महिला धोरण ठरविण्यासाठी लवकरात लवकर अभिप्राय नोंदवा-जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी-राज्यातील एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि कायदेशीर सक्षमीकरणासाठी राज्य शासनाकडून स्वतंत्र एकल महिला धोरण तयार करण्यात येत असून हे धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि वास्तवाधिष्ठित व्हावे यासाठी सर्व संबंधित घटकांनी आपले अभिप्राय, सूचना आणि प्रस्ताव लवकरात लवकर नोंदवावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे आज एकल महिला धोरणासाठी जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विविध विभागांचे अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी तसेच संबंधित घटक सहभागी झाले होते.या प्रसंगी पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जी. बी. गिरी, महिला व बाल विकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, महिला व बाल विकास अधिकारी गणेश वाघ तसेच विविध विभागांचे अधिकारी आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.राज्यातील एकल महिलांसाठी स्वतंत्र आणि परिणामकारक धोरण तयार करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली होती. त्यानुसार महिला व बाल विकास मंत्री आणि राज्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बाल विकास आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मसुदा समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमार्फत राज्यभरातून सूचना आणि अभिप्राय संकलित करून अंतिम धोरण निश्चित केले जाणार आहे.

# सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-सामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी न्याय व तत्परतेने सोडविण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. जिल्हा प्रशासनाच्यावतीने लोकशाही दिन सोमवार ६ जुलै २०२६ रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे आयोजित केला आहे.

या दिवशी महसूल, गृह, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषि विभाग व पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाचे लोकशाही दिनात प्रलंबीत प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित राहतील. सकाळी १२ वाजेपासून निवेदनाची नोंदणी सुरु होणार आहे. त्यानंतर लगेचच प्राप्त झालेल्या अर्जावर, निवेदनावर म्हणणे ऐकून घेण्याच्या कामास सुरुवात करण्यात येईल.

# राज्याच्या आर्थिक धोरणावर दानवेंचा घणाघात

मुंबई/प्रतिनिधी-राज्यावर वाढत्या कर्जाचा डोंगर असताना सरकार विकासाचे दावे करत असले, तरी प्रत्यक्षात कँत्राटदारांची थकीत बिले, जलजीवन मिशनची रखडलेली कामे, सिंचनाचा वाढता अनुशेष, शिक्षण-आरोग्य क्षेत्रातील गंभीर समस्या आणि ग्रामीण भागातील विकासकामांकडे सरकारने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप शिवसेना नेते तथा माजी विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी केला. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान त्यांनी सरकारच्या आर्थिक धोरणावर जोरदार हल्लाबोल केला.

दानवे म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, पाणीपुरवठा आदी विभागांची मिळून तब्बल ९६ हजार ४०० कोटी रुपयांची देयके थकीत आहेत. कामे पूर्ण करूनही बिले न मिळाल्याने अनेक कँत्राटदार आर्थिक अडचणीत सापडले असून सांगलीतील जलजीवन मिशनचे कँत्राटदार हर्षल पाटील, नागपूरचे पी. व्ही. वर्मा यांच्यासह चार कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याची गंभीर बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. राज्यात जलजीवन मिशनअंतर्गत सुमारे ५१ हजार कामांना मंजुरी मिळाली असून त्यापैकी सुमारे २४ हजार कामे पूर्ण, तर २६ हजारांहून अधिक कामे अद्याप अपूर्ण आहेत. या योजनेची सुमारे ३५ हजार कोटी रुपयांची थकबाकी असून कामे पूर्ण करण्यासाठी आणि देखभालीसाठी आणखी ६ हजार ८०० कोटी रुपयांची आवश्यकता आहे. मात्र पुरवणी मागण्यांमध्ये यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद नसल्याची टीका त्यांनी केली. मराठवाडा आणि विदर्भातील सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी सुमारे २ लाख ८५ हजार कोटी रुपयांची गरज असल्याचे सांगत दानवे यांनी वैनगंगा-नळगंगा, पैनगंगा-दमनगंगा-वैतरणा-गोदावरी यांसारखे नदीजोड प्रकल्प केवळ घोषणांपुरतेच मर्यादित राहिल्याचा आरोप केला.

# काँग्रेस पक्षातील नेत्यांनी पराभूत करण्याची रणनीती आखली-साहेबराव कांबळे




उमरखेड/प्रतिनिधी-विधान परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडे १९२ मते असल्याचे आश्वासन जिल्हाध्यक्षांकडून देण्यात आले होते. आणखी ५० मतांची जुळवाजुळव करू, असेही सांगितले होते. मात्र काँग्रेसच्या बैठकीत १८३ नगरसेवक उपस्थित असताना केवळ ३४ नगरसेवकांनीच माझ्या समर्थनार्थ हात वर केले. काही नेत्यांनी त्यावर टाळ्या वाजवल्या. तेव्हाच माझ्याच पक्षाने मला पराभूत करण्याची रणनीती आखल्याचे लक्षात आले. नामुष्की टाळण्यासाठी मी उमेदवारी मागे घेतली. असा गौप्यस्फोट काँग्रेसचे माजी प्रदेश सरचिटणीस साहेबराव कांबळे यांनी त्यांच्या निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत बोलतांना केला.

पुढे बोलतांना ते म्हणाले की मी काँग्रेस पक्ष सोडलेला नाही. विधान परिषद निवडणुकीतून उमेदवारी मागे घेतल्यानंतर पक्षाने कोणतीही नोटीस किंवा खुलासा न मागवता मला निलंबित केले. त्यामुळेच मी शिवसेना (शिंदे गट) नेतृत्वाच्या संपर्कात आलो आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला, असा दावा साहेबराव कांबळे यांनी केला. मी कोणाच्याही दबावाखाली उमेदवारी मागे घेतली नसून,माझ्या स्वाभिमानासाठी मी हा निर्णय घेतला.असेही त्यांनी स्पष्ट केले.मला नोटीस न देता पक्षातून काढल्यामुळेच माझी नाराजी झाली. विधान परिषद निवडणुकीत राज्यातील १७ पैकी सहा उमेदवारांनी माघार घेतली. मग फक्त मलाच निलंबित का केले ? मी दलित असल्यामुळेच माझ्यावर अन्याय झाला का? असाही प्रति प्रश्न त्यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी आंदोलन करणाऱ्या रमेश चव्हाण यांच्यावरील हल्ल्याचा त्यांनी यावेळी निषेध केला. या पत्रकार परिषदेला शिवसेनेचे संपर्कप्रमुख चितांगराव कदम, तालुकाप्रमुख प्रवीण पाटील मिराशे, संतोष जाधव, शहरप्रमुख ॲड. संजय जाधव, रविकांत रुडे आदी उपस्थित होते.

# नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेसाठी डॉ.मिनल खतगावकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल




नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी डॉ.मिनल पाटील खतगावकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

डॉ.मिनल पाटील खतगावकर यांनी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या माध्यमातून त्या सहकार क्षेत्रात प्रदार्पण करीत आहेत. गेल्या चार ते पाच दशकापासून नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात व सहकार क्षेत्राचा दांडगा अनुभव असणारे माजी खा.भास्करराव पाटील खतगावकर यांचा मार्गदर्शनाखाली सहकार क्षेत्रात काम करण्यासाठी सक्रीय झाल्या आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील अ प्राथमिक कृषी पथ पुरवठा व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था तसेच धान्य आधीकोष सहकारी संस्था बिलोली या मतदारसंघातून त्यांनी आज (मंगळवार) आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केला. यावेळी माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, माजी उपमहापौर सरजितसिंघ गील, भास्कर भिलवंडे, अशोक पाटील मुगावकर, बाळासाहेब पाटील खतगावकर, बाबाराव भाले, रवी पाटील खतगावकर, आनंदराव बिराजदार, दीपक पावडे, प्रताप पाटील चिखलीकर, आनंदराव शिंदे नागेलीकर, व्यंकटराव पांडवे, गंगाधर अनपलवार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी कंधारमध्ये मातंग समाजाचा विराट मोर्चा

कंधार/प्रतिनिधी-अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे अ,ब,क,ड नुसार उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे या प्रमुख मागणीसह मातंग समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने सोमवारी (दि.२९) कंधार येथे भव्य आक्रोश महामोर्चा काढण्यात आला.

तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात सर्वोच्च न्यायालयाच्या १ ऑगस्ट २०२६ च्या आदेशानुसार अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण लागू करणे, साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देणे व इतर मागण्यांसाठी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. आंदोलनस्थळी माजी आ.सुधाकर भालेराव (उदगीर), अण्णाभाऊ साठे क्रांति सेना संस्थापक सचिन साठे आणि आरक्षण अभ्यासक केशव शेकापुरकर यांनी भेट देऊन आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. या आंदोलनाच्या यशस्वी आयोजनासाठी रामभाऊ देव कांबळे, पंडितराव देवकांबळे, बालाजी वाघमारे, नगरसेवक कैलास कांबळे, नगरसेवक दिलीप बसवंते, बालाजी कांबळे, महेंद्र कांबळे, विलास, मल्हारराव वाघमारे, विजय वाघमारे, बाबुराव टोम्पे, विलास गायकवाड, एम. पी. गायकवाड, संभाजी गडंबे, ॲड.सचिन कांबळे, आकाश घोडजकर मुन्ना बसवंते, हनुमंत घोरपडे, प्रकाश ननुरे, व्यंकट घोरपडे, ईश्वर येरेकर, पंडित भटलारे व इतरांनी विशेष परिश्रम घेतले. कंधार तालुक्यातील विविध गावांतून मोठ्या संख्येने समाजबांधव आंदोलनात सहभागी झाल्याने मोर्चाला व्यापक प्रतिसाद मिळाला.

# स्वस्त धान्य दुकानातील अनियमिततेची चौकशीची मागणी

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद तालुक्यातील मौजे रोषणगाव येथील स्वस्त धान्य दुकानदार प्रकाश कदम यांच्याकडून होत असलेल्या कथित अनियमितता, धान्य वितरणातील गैरप्रकार व ग्राहकांशी गैरवर्तनाबाबत भीम आर्मीच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात ग्राहकांना धान्य घेण्यासाठी केवळ एका दिवसाची मुदत दिली जात असल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यानंतर कोटा संपला किंवा परत गेला असे सांगून अनेक लाभार्थ्यांना धान्यापासून वंचित ठेवले जात असल्याचे म्हटले आहे. तसेच प्रति राशनकार्ड मागे सुमारे पाच किलो धान्य कमी दिले जात असल्याची तक्रारही करण्यात आली आहे. याशिवाय ई-पॉस मशीनमधून मिळणारी अधिकृत पावती ग्राहकांना न देता साध्या चिठ्ठीवर धान्याची नोंद दिली जात असल्याने वितरण प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे धान्याचा अपहार व शासन नियमांचे उल्लंघन होत असल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून वितरण नोंदी, स्टॉक रजिस्टर, ई-पॉस मशीनचा डेटा व संबंधित कागदपत्रांची तपासणी करावी तसेच दोषी आढळल्यास संबंधित दुकानदारावर कठोर कारवाई करून स्वस्त धान्य दुकानाचा परवाना रद्द करण्यात यावा, अशी मागणी भीम आर्मीच्या वतीने करण्यात आली आहे.

# मांडवी येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर करा;अन्यथा ५ जुलैपासून आमरण उपोषण!

## माजी सरपंच धनलाल पवार यांचा शासनाला इशारा



मांडवी/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील विदर्भ व तेलंगणा राज्याच्या सीमेवर वसलेल्या आणि महत्त्वाची बाजारपेठ असलेल्या मांडवी येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर करण्यात यावे, अन्यथा येत्या ५ जुलै २०२६ पासून आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा मांडवीचे माजी सरपंच धनलाल पवार यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व महसूल मंत्री यांना लेखी निवेदन पाठवले आहे.

मांडवी परिसरातील नागरिकांची ही मागणी गेल्या ३० वर्षांपासून प्रलंबित आहे. किनवट हे तालुक्याचे ठिकाण मांडवीपासून तब्बल ५० किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे या दुर्गम व आदिवासी भागातील गरीब शेतकरी, मजूर, पालकांना आणि विद्यार्थ्यांना छोट्या-मोठ्या शासकीय कामांसाठी, प्रमाणपत्रांसाठी पैसा आणि वेळ खर्च करून किनवटला जावे लागते. हा भुर्दंड थांबवण्यासाठी मांडवी येथे स्वतंत्र अप्पर तहसील कार्यालय होणे अत्यंत गरजेचे आहे.मांडवी हे परिसरातील सर्वांत मोठे केंद्र असून येथे स्टेट बँक, जिल्हा बँक, पोलीस स्टेशन, वनविभाग कार्यालय, ३३ केव्ही उपकेंद्र, शासकीय विश्रामगृह, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, पेट्रोल पंप, गॅस एजन्सी तसेच नामांकित शाळा, महाविद्यालये व मुला-मुलींची वसतिगृहे कार्यरत आहेत. विशेष म्हणजे, अप्पर तहसील कार्यालयासाठी लागणारी शासकीय जागा आणि इमारती मांडवीत आधीपासूनच उपलब्ध असल्याने शासनावर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही. या मागणीसाठी परिसरातील तब्बल ८३ ग्रामपंचायतींनी अधिकृत ठराव देऊन आपला जाहीर पाठिंबा दिला आहे. धनलाल पवार हे सरपंच असताना, शासनाने सन २००५ मध्ये मांडवी येथे नायब तहसीलदार कार्यालय मंजूर केले होते, याकडेही त्यांनी निवेदनात लक्ष वेधले आहे. शासनाने ज्याप्रमाणे किनवटला अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय आणि इस्लापूरला अप्पर तहसील कार्यालय मंजूर केले, त्याच धर्तीवर मांडवीचा हक्क डावलू नये, अशी मागणी धनराज पवार यांनी निवेदनात केली.

# पुसद ऐवजी उमरखेडलाच अपर जिल्हाधिकारी कार्यालय द्या:कोडगीरवार

उमरखेड/प्रतिनिधी-यवतमाळ जिल्ह्यात प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालय पुसद येथे स्थापन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. मात्र, या निर्णयाला उमरखेड तालुक्यातून तीव्र विरोध होत आहे. हे कार्यालय उमरखेड येथेच मंजूर करण्यात यावे, अशी मागणी नगरसेवक सुरेंद्र कोडगीरवार यांनी शासनाकडे केली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री, महसूल मंत्री व जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात उमरखेड तालुक्याची भौगोलिक स्थिती, सीमावर्ती स्थान, दुर्गम भागातील नागरिकांची गैरसोय तसेच प्रशासनाच्या विकेंद्रीकरणाची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. यवतमाळ जिल्ह्याच्या पूर्व टोकाला असलेला उमरखेड तालुका थेट नांदेड जिल्हा व तेलंगणा राज्याच्या सीमेला लागून आहे. त्यामुळे अनेक गावांतील नागरिकांना प्रशासकीय कामांसाठी यवतमाळ किंवा पुसदला मोठ्या अंतराचा प्रवास करावा लागतो.प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालय उमरखेड येथे झाल्यास हजारो नागरिकांना स्थानिक स्तरावरच न्याय व प्रशासकीय सेवा उपलब्ध होतील, असे निवेदनात नमूद आहे.उमरखेडमध्ये आधीपासूनच उपविभागीय अधिकारी कार्यालय, उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय, न्यायालय तसेच इतर प्रशासकीय यंत्रणा कार्यरत आहेत. त्यामुळे नवीन कार्यालयासाठी आवश्यक पायाभूत सुविधा व शासकीय जागा सहज उपलब्ध होऊ शकतात.तालुक्यात दरवर्षी पूरस्थिती, पुनर्वसन, इसापूर धरणाच्या बॅकवॉटरचे प्रश्न, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे भूसंपादन व विविध महसुली प्रकरणे निर्माण होत असतात. त्यामुळे येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालयाची आवश्यकता असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

पान १ वरुन

### एनडीसीसी बँक...

नेत्यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहे. सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या नेत्यांची या संदर्भात बैठक झाली. परंतु या बैठकीतील चर्चेचा तपशील समजू शकला नाही. माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोक चव्हाण यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक भाजपच्या ताब्यात रहावी यासाठी प्रयत्नशिल आहेत.

पान १ वरुन

### शिंदेंचे ऑपरेशन टायगर...

सहा खा. संजय दिना पाटील, ओमराजे निंबाळकर, संजय हरिभाऊ जाधव, नागेश पाटील-आष्टीकर, संजय देशमुख आणि भाऊसाहेब वाकचौरे यांनी ठाकरे गटाची साथ सोडून स्वतंत्र भूमिका घेत एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर सचिन अहिर यांच्या भूमिकेबाबतही विविध राजकीय तर्कवितर्क सुरू झाले होते.संजय दिना पाटील आणि सचिन अहिर यांचे निकटचे राजकीय संबंध असल्याने अहिरही शिंदे गटात जाणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. पावसाळी अधिवेशना दरम्यान ते ठाकरे गटाच्या बाकांवर उपस्थित राहत असतानाच त्यांनी अचानक शिंदे गटाकडून उपसभापती -पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

### टीईटी पेपरफुटीचे रॅकेट...

अपेक्षित होते. मात्र त्या भिवंडीमध्ये कशा पोहोचल्या, याचा शोध पोलीस घेत आहेत. पकडलेले आरोपी बिहार आणि हरियाणातील असल्याने या प्रकरणामागे राज्याबाहेरील संघटित रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता अधिक बळावली आहे.पोलीस तपासात विजयेंद्र कुमार ऊर्फ विजेंद्र गुप्ता हा संपूर्ण कटाचा मुख्य सूत्रधार असल्याचे समोर आले आहे. तो बिहारमधील समस्तीपूर जिल्ह्यातील शेरपूर गावचा रहिवासी असून यापूर्वीही स्पर्धा परीक्षा पेपरफुटीच्या अनेक प्रकरणांशी त्याचे नाव जोडले गेले आहे. २०२३ मध्ये ओडिशातील पेपरफुटी प्रकरणात त्याच्याविरुद्ध दोन गुन्हे दाखल झाले होते आणि त्याला अटकही करण्यात आली होती.

### किनवट बाजार समितीतील...

करण्यात आलेल्या हातशिलक, नियमबाह्य खर्च, आर्थिक त्रुटी व आक्षेपांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच पणन संचालकांची पूर्वपरवानगी न घेता करण्यात आलेल्या हंगामी नियुक्त्या व इतर प्रशासकीय निर्णयांमुळे समितीचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. तक्रारदारांनी संपूर्ण कालावधीतील आर्थिक व प्रशासकीय व्यवहारांचे स्वतंत्र विशेष लेखापरीक्षण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नियुक्त करण्याची मागणी केली आहे. यासाठी सर्व मूळ अभिलेख, बँक खाती, कॅशबुक, लेजर, व्हाउचर, पावती पुस्तके, ठराव पुस्तिका, कर्मचारी सेवा अभिलेख व जमीन विक्रीची कागदपत्रे ताब्यात घेऊन तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही नोंदींमध्ये फेरफार होऊ नये म्हणून संरक्षणात्मक आदेश देण्याचीही विनंती करण्यात आली आहे. तक्रारीत दोषी तत्कालीन सभापती, सचिव, संचालक, अधिकारी व कर्मचारी यांची वैयक्तिक जबाबदारी निश्चित करून फौजदारी कारवाई करावी अशी मागणी सभापती गजानन मुंडे यांनी केली आहे.

# मुख्यालय न राहणाऱ्या शिक्षकांवर कारवाई होणार

देगलूर/प्रतिनिधी-छत्रपती संभाजीनगर विभागातील जिल्हा परिषद व अनुदानित शाळांमध्ये मुख्यालय न राहता अपडाऊन करणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यावर शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नियमाचे उल्लंघन करणाऱ्या शिक्षकांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे. तसेच मुख्यालय राहत असल्याचे दाखवण्यासाठी बनावट भाडे करार किंवा खोटी कागदपत्रे सादर करणाऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल केली जाणार आहेत.

२०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून मुख्यालय न राहता अपडाऊन करणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यावर तात्काळ शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. तसेच मुख्यालय वास्तव्यास असल्याचे भासविण्यासाठी खोटे भाडेकरार बनावट कागदपत्रे किंवा चुकीची माहिती सादर करणाऱ्या विरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याची स्पष्ट निर्देश शिक्षण विभागाने दिले आहेत. विभागीय प्रशासनाने सर्व गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख ,विस्तार अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना अध्यक्ष पडताळणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. खासगी, अनुदानित शाळांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचीही तपासणी करण्यात येणार असून नियमाचे उल्लंघन करणाऱ्यावर कोणतीही दया न दाखवता नियमानुसार कठोर कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या आदेशामुळे छत्रपती संभाजी नगर विभागातील शिक्षकांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, विशेषता: नांदेड जिल्हा व देगलूर तालुक्यातील शिक्षकांचेही लक्ष आता शिक्षण विभागाच्या पुढील कारवाईकडे लावली आहे. नियम भंग करणाऱ्यावर प्रशासन किती कठोर भूमिका घेते. याकडे संपूर्ण शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४